जिल्हा आपत्ती आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागि़री
(2 रा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जुनी इमारत)
फ़ोन - 02352 -226248 / 222233 , फ़ॅक्स - 02352 -226250 Email-
ddmaratnagiri@gmail.com

---

क्रमांक- जिआव्यप्रा/निक/आदेश/सूट्टी/08/2025 दिनांक -19/08/2025

---

**आदेश**

---

**वाचले -**

1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 कलम कलम 25, 30 (2) (3) (5) व (18)
2. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण - 2019/प्र.क्र.199/एस.डी.2, दिनांक - 02/08/2019
3. भारतीय हवामान विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 19/08/2025 रोजीची हवामान विषयक पूर्वसूचना
4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांजकडील पत्र क्रमांक - रजिप/शिक्षण/प्राथ/ड-8/7974/2025, दिनांक - 19/08/2025

**आदेश :-**

ज्याअर्थी, उक्त नमुद अ. क्र. 2 अन्वये प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्हयातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरीता अथवा जिल्हयातील ठरावीक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधीकारी म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क. 2 कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी हवामान विभागाने दिलेल्या पुर्वसुचनेनुसार रत्नागिरी जिल्ह्यात उद्या दिनांक 20/08/2025 रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला आहे व रत्नागिरी जिल्हयात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. रत्नागिरी जिल्हयातील अनेक भागात मुसळधार पाउस सुरु असल्याने तसेच खेड तालुक्यातील जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली आहे, चिपळूण येथील वाशिष्ठी, संगमेश्वर येथील शास्त्री व बावनदी, लांजा येथील काजळी, राजापूर येथील कोदवली या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. रत्नागि़री जिल्हयात अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रत्नागिरी जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यावर होऊ नये या करिता जिल्हयातील सर्व शाळा व महाविद्यालये (अंगणवाडी, पुर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय) विद्यार्थांना **उद्या दिनांक 20/08/2025 रोजी** सुट्टी असणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

त्याअर्थी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रत्नागिरी यांचे मान्यतेने रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये तसेच आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षक केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना **उद्या दिनांक 20/08/2025 रोजी** सुट्टी जाहिर करण्यात येत आहे.

<u>मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने</u>

(चंद्रकांत सूर्यवंशी)
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रत्नागिरी**

**प्रत -**

1. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
3. पोलिस अधिक्षक, रत्नाग़िरी यांना माहिती व उचित कार्यवाही करीता
4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नाग़िरी यांना माहिती व उचित कार्यवाही करीता
5. उपविभागीय अधिकारी - सर्व
6. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद रत्नागिरी यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना दण्यात यावी
7. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जि.प. रत्नाग़िरी माहिती व उचित कार्यवाही करीता
8. जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी यांना प्रसिद्धीसाठी
9. संचालक आकाशवाणी केंद्र रत्नाग़िरी यांनी आपल्या स्तरावरून प्रसिध्दी द्यावी.

Scanned with OKEN Scanner